बँक ऑफ महाराष्ट्र
Bank of Maharashtra
एक परिवार एक बैंक

**Corporate Communications & Investor Relations**
Head Office: LOKMANGAL, SHIVAJINAGAR, PUNE-5
TELE -020 :25614495, 25614366, 25514501 to 12 Extn.

## वृत्तपत्रीय निवेदन

# बँक ऑफ महाराष्ट्र व भारतीय राष्ट्रीय प्रदान महामंडळ (एन पी सी आय ) हे वित्तीय तंत्रज्ञान (फिनटेक ) क्षेत्रात काम करण्यासाठी एकत्र




**फोटोमध्ये (डावीकडून उजवीकडे):** श्री नलिन बन्सल, कॉर्पोरेट आणि फिनटेक संबंध आणि प्रमुख उपक्रमांचे प्रमुख, श्री आशीष पांडे, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र आणि श्री ए बी विजयकुमार, कार्यकारी संचालक, बँक ऑफ महाराष्ट्र

**पुणे ५ एप्रिल २०२२** : सार्वजनिक क्षेत्रातील अग्रगण्य बँक असलेल्या बँक ऑफ महाराष्ट्रने आपल्या मुख्य कार्यालयात वित्तीय तंत्रज्ञान सेवा सुविधा निर्माण करण्यासाठी भारतीय राष्ट्रीय प्रदान महामंडळाशी ( एन पी सी आय ) चर्चासत्र आयोजित करून हातमिळवणी केली आहे. बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार व श्री आशिष पांडेय हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भारतीय राष्ट्रीय प्रदान महामंडळाचे ( एन पी सी आय ) कॉर्पोरेट आणि फिनटेक संबंध व प्रमुख उपक्रम विभागाचे मुख्याधिकारी श्री नलीन बन्सल हे सुद्धा चर्चासत्रात सहभागी झाले होते. बँकेचे सर्व सरव्यवस्थापक, डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञान टीम, हे प्रत्यक्ष व विभागीय व्यवस्थापक हे आभासी पद्धतीने या कार्यक्रमात सहभागी झाले होते. तसेच ४२ कार्ड्स, डाटासूत्रम, फिनवू, डीलसेफ, मोफायदा, फोर्टीएट राईज रिटेल व पेमेंट सोल्युशन्स व लेंडपार्टनर इत्यादी विविध वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रातील नवोपक्रम या कार्यक्रमात सहभागी झाले होते.

बँकिंग क्षेत्राने तंत्रज्ञानावर लक्ष केंद्रित करणे ही काळाची गरज असल्याचे आणि हे बँकेसाठी नव्हे, तर राष्ट्रबांधणीची प्रक्रिया असल्याचे प्रतिपादन बँक ऑफ महाराष्ट्रचे कार्यकारी संचालक श्री ए बी विजयकुमार यांनी केले. बँकिंग व्यवहारांचा प्राणवायू असलेल्या भारतीय राष्ट्रीय प्रदान महामंडळाशी ( एन पी सी आय ) स्वतःला जोडून घेण्यात व युनायटेड पेमेंट इंटरफेस ( यु पी आय ) , राष्ट्रीय संचालित संशोधन गृह ( एन ए सी एच ) , रूपे, आधार सक्षम पेमेंट पद्धती ई. सोबत भागीदारी करण्यात बँक ऑफ महाराष्ट्राला अतिशय आनंद होत असल्याचे त्यांनी सांगितले. बँका सार्वजनिक रकमांचे व्यवहार करीत असल्यामुळे त्यातील उपाययोजना किमान खर्चिक असणे गरजेचे असल्याचा अभिप्राय श्री विजयकुमार यांनी व्यक्त केला. सन २०२२ – २३ हे बँक ऑफ महाराष्ट्रसाठी डिजिटल वर्ष असल्याचे श्री विजयकुमार म्हणाले.

दिनांक १ एप्रिल २०२२ पासून दोन आठवड्यांच्या या वित्तीय तंत्रज्ञान ( फिनटेक ) महोत्सवाचे अत्युत्तम आयोजन करण्यासाठी घेतलेल्या पुढाकार व मेहेनतीसाठी बँकेच्या डिजिटल आणि माहिती तंत्रज्ञान टीमचे बँकेचे कार्यकारी संचालक श्री आशिष पांडेय यांनी कौतुक केले. कोणत्याही प्रगतीशील संस्थेचे व्यवसाय नियोजन हे संस्थेची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी विविध संसाधने व तंत्रज्ञानावर अवलंबून असते असे त्यांनी ठासून सांगितले. योग्य अशा संरचना, व्यक्ती व प्रक्रियांचा उपयोग करून अपेक्षित परिणाम साधण्यासाठी तंत्रज्ञान व व्यावसायिक निर्णय प्रक्रिया ही अंतर्गत व बाह्य माहितीवर अवलंबून असते यावरही त्यांनी भर दिला. वित्तीय तंत्रज्ञान / तंत्रज्ञानाचे अंतरनिरासन अवलंबण्याची गरज असलेल्या क्षेत्रांचा बँक शोध घेत असून त्यांच्या विशेषत्वानुसार वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रातील अभियोजन करण्यात येईल असेही श्री पांडेय यांनी सांगितले.

कार्यक्रमास संबोधित करताना भारतीय राष्ट्रीय प्रदान महामंडळाच्या ( एन पी सी आय ) कॉर्पोरेट आणि फिनटेक संबंध व प्रमुख उपक्रम विषयक विभागाचे मुख्याधिकारी श्री नलीन बन्सल यांनी कार्यान्वयनाआधी संकल्पना विकसित करून अशा पद्धतीचा मजबूत व समर्पक पुढाकार प्रथमच घेऊन एक आश्वासक पाउल पुढे टाकल्याबद्दल बँक ऑफ महाराष्ट्राचे अभिनंदन केले. ग्राहकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी बँकिंग यंत्रणेने स्वतःला संरचित करणे आवश्यक आहे यावर त्यांनी भर दिला. भारतात वित्तीय तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड गुंतवणूक करण्यात आली असून भविष्यात कॅप्टिव्ह मार्केट अधिक मजबूत करून सार्वजनिक क्षेत्रातील बँकांच्या समावेशासह अनेक नव्या बाबी येऊ घातल्या आहेत असेही त्यांनी सांगितले.